डी. पी. भोसले
ग्रंथालय
कोरेगाव

३४

संपूर्ण ... सार पावले
साता... मुख सामना

dhansantosh123@gmail.com
मोबा. 9822107981

RNI NO.-54719/84

# धनसंतोष

▪ संस्थापक । श्री. भाऊसाहेब नलावडे ▪ संपादक । सौ. विमल नलावडे ▪ PRN No. - STR/009/2015-2017

। वर्ष ३४ वे । । अंक ३२ वा । । शनिवार दि. २३।१२।२०१७ । २ रुपये

# डी.पी. भोसले कॉलेजमध्ये विजय दिन सोहळा संपन्न

कोरेगाव । संरक्षण क्षेत्रातील संधीच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी देशसेवेसाठी पुढे यावे, असे आवाहन ब्रिगेडियर सुनील बोधे यांनी केले.

येथील डी.पी. भोसले महाविद्यालय व विजय दिन समारंभ समितीतर्फे आयोजित केलेल्या विजय दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील होते. कर्नल राजेंद्र जाधव, कॅप्टन महादेव भोसले यांचीही भाषणे झाली. याप्रसंगी हुतात्मा जवान गणेश कृष्ण ढवळे, दीपक जगन्नाथ घाडगे, रवींद्र बबन धनावडे, सुभाष लाला करांडे यांच्या प्रतिमांना पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. हुतात्मा जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता व कुटुंबीयांचा तसेच दुसऱ्या महायुद्धातील सहभागी पांडुरंग जाधव व दत्तू कासार यांचाही सत्कार झाला. कार्यक्रमात आरे येथील शिवतेज विद्यालयाने मल्लखांब, कोरेगाव येथील चॅलेंज ॲकॅडमीने बँड डिस्प्ले, सातारा येथील चॅंपियन्स कराटेकडून सेल्फ डिफेन्स, डी.पी. भोसले महाविद्यालयाने धनुर्विद्या, तायक्वांदो, जोगवा, सरस्वती इंग्लिश मीडियम स्कूलने ॲरोबिक्स, अश्ववंदना हुतात्मा श्रद्धांजली, सिव्हिल बँड शिरढोण यांची प्रात्यक्षिके सादर झाली.



विजय दिवस समारंभात वीर जवानांना अभिवादन करताना चॅलेंज ॲकॅडमीचे विद्यार्थी समवेत मान्यवर. (छाया. अधिक बर्गे)

रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कर्नल विष्णूपंत चव्हाण, आजी-माजी सैनिक संघटना, नगरपंचायतीसह विविध संस्थांचे सहकार्य लाभले. डॉ. विद्या नावडकर, प्रा. भीमराव मदने, प्रा. संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. भीमराव मदने यांनी आभार मानले.

कार्यक्रमास धनसंतोषचे संस्थापक भाऊसाहेब नलावडे, सी. आर. बर्गे, बलभिम भोसले, रामभाऊ घारगे, कॅप्टन महादेव भोसले, प्रा. बाळासाहेब भोसले यांच्यासह नागरीक, विद्यार्थी उपस्थित होते.